गुरुवार, दि. १० एप्रिल २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २४७ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## बालकांच्या आधारवरील बायोमेट्रीक अद्यावतीकरणासाठी मोहीम

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयामार्फत बाल आधार नोंदणी व बायोमेट्रीक अद्यावतीकरणासाठी मोहिम दि.१ एप्रिल ते ३० जून २०२५ पर्यंत राबविण्यात येत आहे. मोहिमेअंतर्गत ० ते ५ वर्ष वयोगटातील बालकांची नवीन आधार नोंदणी व ५ ते ७ आणि १५ ते १७ वयोगटातील बालकांचे बायोमेट्रीक अद्ययावत करण्याचे उद्दीष्ट आहे. जिल्हा प्रशासन, महा-ई-सेवा केंद्र, शाळा, अंगणवाड्या आणि स्थानिक स्वराज्य संस्थेच्या संयुक्त सहकार्याने ही मोहीम प्रभावीपणे राबविली जाणार आहे, तरी जिल्ह्यातील नागरिकांनी आपल्या बालकांचे नवीन आधार नोंदणी तसेच आधार अद्यावतीकरण करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

बाल आधार नोंदणी व बायोमेट्रीक अद्यावतीकरणाची मोहिम आधार केंद्रावर राबविली जाणार आहे. ज्यामध्ये शहरी, ग्रामीण व दुर्गम भागातील ० ते ५ वयोगटातील बालकांची नवीन आधार नोंदणी व अद्यावतीकरण करण्यात येणार आहे. ज्यामध्ये चांगले काम करणारे गाव पातळीवरील उद्योजकांना प्रोत्साहन म्हणून प्रत्येक महसूल विभागातून प्रथम तीन गावपातळीसाठी अनुक्रम १ लाख रुपये, ५० हजार रुपये व ३० हजार रुपये पारितोषिक देण्यात येणार आहे. राज्यातील लाखो बालकांची आधार नोंदणी व आधार अद्ययावत प्रक्रिया शिल्लक असून ही मोहिम त्यासाठी अत्यंत महत्वपूर्ण आहे. या मोहिमेमुळे बालकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ पान २ वर

युवा आदर्श

### महावीर ...

नमो नम: महावीरा
शील सत्य मंत्र खरा
अहिंसा परमो धर्म
मार्गदर्शी तिर्थकरा
अपरिग्रह त्यागकरा
अस्तेय विरक्त वरा
सर्वे संतु निरामय:
तुष्टलो शांत मुनीवरा
पंचशील तत्व सत्व
मनोभावे अंगीकारा
सर्वेंद्रावर जय भला
जितेंद्रीय तोचि खरा
णमोकार मंत्रोच्चारा
मन गाभारी उच्चारा
अंतरंग पवित्र होता
नाम जाई दिगंतरा
स्थानका जैनमंदिरा
जयंती साजरी करा
नियमपालन करता
अभिषेक रेमहावीरा
धर्म दाखविती मार्ग
दूर करिती अंधकारा
जोडून देतो समाजा
चालना दे सद्विचारा
मिच्छामि दुक्कडम्
क्षमा याचना रे करा
चुकून जरी चूक होई
जोडायचे दोन्ही करा
उपवासाने देहशुध्दी
मन शुद्धी मंत्रोच्चारा
जैन धर्म तंतोतंत तो
पालन चलन विचारा

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# वाढदिवसानिमित्त माजी आ. कैलास गौरंट्याल यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव


















वाढदिवसानिमित्त बुधवार (दि ९) रोजी माजी आमदार कैलास गोरंट्याल यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव झाला. शहरातील गुरु गणेश भवन येथे माजी आ. गोरंट्याल यांनी शुभेच्छांचा स्विकार केला. पुष्पवृष्टी, सत्कार, पुष्पगुच्छ देऊन विविध स्तरातील मान्यवर, व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय पुढारी, पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी माजी आ. गोरंट्याल यांना शुभेच्छा दिल्या. त्यांच्या दीर्घ आयुष्यासाठी विविध मंदीरामध्ये पुजाअर्चा करण्यात आली. गुरु गणेश भवनसह त्यांच्या निवासस्थानी त्यांना शुभेच्छा देण्यासाठी मोठी मोठी गर्दी झाली होती. (छाया/जावेद तंबोली)

## ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासातूनच भारत प्रगत राष्ट्र बनेल

### आमदार बबनराव लोणीकर यांचे प्रतिपादन

**परतुर । प्रतिनिधी -** ग्रामीण भागाचा विकास करणे म्हणजे खऱ्या अर्थाने देशाच्या विकासाला हातभार लावणे आहे असे मी समजतो. महाराष्ट्रातील ग्रामीण भागाचा विकास म्हणजे आर्थिक, सामाजिक आणि भौतिक सुविधा यांसोबतच, लोकांच्या जीवनमानामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. शेती आणि उद्योगांना प्रोत्साहन देणे, आणि स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत विकास करणे, शेती आणि पशुपालनात सुधारणा, नवीन रोजगार निर्मिती, आणि उद्योगांना प्रोत्साहन देणे यासह शिक्षण, आरोग्य, आणि पिण्याच्या पाण्याचा पुरवठा यांसारख्या सुविधा उपलब्ध करणे आवश्यक आहे त्याचप्रमाणे रस्ते, वीज, आणि पाणीपुरवठा यांसारख्या सुविधा विकसित करणे अत्यंत आवश्यक आहे. त्याशिवाय ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास होणे शक्य होणार नाही ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासातूनच भारत प्रगत राष्ट्र बनू शकते असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी आज केले.




परतुर तालुक्यातील आष्टी येथे ग्राम दरबार कार्यक्रम संपन्न झाला असून या ग्राम दरबार अंतर्गत अधिकारी व कर्मचाऱ्यांनी झिरो पेंडन्सी वर लक्ष केंद्रित करणे आवश्यक असून ग्राम दरबार झाल्यानंतर सर्व समस्यांचे निराकरण करणे आवश्यक आहे. प्रत्येक तालुक्यातील एका एका गावात एक दिवस गावक-यांसोबत (ग्राम दरबार उपक्रम) हा नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्याचे नियोजन करण्यात आला. यावेळी ग्राम दरबारा निमित्ताने आयुष्मान भारत कार्ड व महात्मा फुले जन आरोग्य योजना आयुष्मान भारत गोल्डन कार्ड बनवून देण्यासाठी ग्राम दरबार निमित्त कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते, याबरोबरच किसान क्रेडिट कार्ड, नवीन आधार कार्ड व दुरुस्ती कॅम्प, क्षयरोग तपासणी शिबिर व रक्त तपासणी शिबिरासह विविध कॅम्पचे देखील आयोजन करण्यात आले होते.

जिल्हा स्तरावरील विविध खाते प्रमुखांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तालुक्याचे वाटप करुन त्यांना रोटेशन पध्दतीने एका तालुक्याच्या एका गावामध्ये उपस्थित राहण्याबाबत निर्देशित करण्यात आले. या उपक्रमाच्या अंतर्गत जिल्हा स्तरीय अधिकारी यांचे समवेत पंचायत समितीच्या कार्यक्षेत्रात येणा-या एका गावास प्रत्येक आठवड्यातील बुधवारी पंचायत समितीचे विविध विभागाचे अधिकारी व ग्राम पातळीचे अधिकारी हे संयुक्तपणे गावात जाऊन ग्रामस्थांसमवेत या उपक्रमाची अंमलबजावणी करतील अशी सूचना देखील यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना केली.

ग्रामपंचायत, पंचायत समिती, आणि जिल्हा परिषद यांसारख्या पान २ वर

## मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळातील शिक्षकांची परीक्षा रद्द!

### मराठवाडा शिक्षक संघाने केली होती मागणी!

**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी -** मराठवाड्यातील नामांकित शिक्षण संस्था मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाने मंडळातील कार्यरत शिक्षकांची आयोजित परीक्षा रद्द केली आहे.

शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता प्राप्त करून शिक्षक झालेल्या आणि गेली वर्षे यशस्वीपणे अध्यापन करणाऱ्या शिक्षकांचा अपमान करणारी ही परीक्षा होती. त्यामुळे या परीक्षेस मंडळातील शिक्षकांनी या परीक्षेस विरोध केला होता.


मराठवाडा शिक्षक संघाने शिक्षकांची नियमबाह्य परीक्षा रद्द करण्याची मागणी शिक्षण उपसंचालक छत्रपती संभाजीनगर यांचेकडे केली होती. तसेच मंडळ कार्यालयासमोर आंदोलनाची हाक दिली होती. याचा परिपाक म्हणजे मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाने शिक्षक परीक्षा रद्द केली आहे.

**हा संघशक्तीचा विजय आहे!**

मराठवाडा शिक्षक संघ शिक्षकांवर होणारा कोणताही अन्याय सहन करणार नाही! जालना जिल्ह्यातील मराठवाडा शिक्षक संघटनेचे केंद्रीय कार्य करण्याचे उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवट्टे, केंद्रीय कार्यकारी सदस्य प्रेमदास राठोड, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य कुरेशी, जिल्हा संघटनेचे अध्यक्ष रमेश आंधळे, जिल्हा उपाध्यक्ष जगनराव वाघमोडे, भीमाशंकर शिंदे, जिल्हा सचिव संजय येळवंते, मार्गदर्शक मारुतीराव तेगमपुरे, श्री काकड, श्री सय्यद, श्री मांडे आदींच्या सह्या होत्या.

## संपादकीय पान

### अहिंसेचे प्रतीक



जैन धर्माचे चोविसावे तीर्थांकार अहिंसेचे मूर्तिमंत प्रतीक भगवान महावीर यांची आज जयंती. भगवान महावीर यांचा जन्म वैशाली राज्याच्या कुंडलपूर येथे इसवी सन पूर्व ५९९ मध्ये झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सिद्धार्थ तर आईचे नाव त्रिशला असे होते. त्यांच्या भावाचे नाव नंदिवर्धन तर बहिणीचे नाव सुदर्शना असे होते. त्यांचे बालपण राजेशाही थाटात गेले. भगवान महावीर आठ वर्षाचे असताना त्यांना शिक्षण आणि शस्त्र विद्येचे प्रशिक्षण घेण्यासाठी शाळेत पाठवण्यात आले. भगवान महावीरांचे कुटुंब जैनांचे तेविसावे तीर्थांकार भगवान पार्श्वनाथ यांचे अनुयायी होते. भगवान महावीर २८ वर्षाचे असतानाच त्यांच्या आईवडीलांचे निधन झाले त्यानंतर त्यांनी श्रामणी दीक्षा घेतली आहे. त्यानंतर काही दिवसांनी त्यांना आत्मज्ञान प्राप्त झाले. त्यांनी १२ वर्ष मौन पाळले. हटयोग्याप्रमाणे त्यांनी शरीराला कष्ट दिले. ज्ञानप्राप्तीनंतर त्यांनी जनकल्याणासाठी उपदेश देण्यास सुरुवात केली त्यासाठी त्यांनी त्याकाळी प्रचलित असणारी अर्धमागधी भाषेचा आधार घेतला. इंद्रिय व विषय वासनेचे सुख दुसऱ्याला दुःख देऊनच मिळवता येते असे त्यांचे मत होते त्यामुळेच त्यांनी जैन धर्माच्या अहिंसा, सत्य, अस्तेय, अपरिग्रह याबाबींमध्ये ब्राम्हचर्याचाही समावेश केला. त्याग, संयम, प्रेम, करुणा, शील व सदाचार हे त्यांच्या प्रवचनाचे सार होते. त्यांनी चतुर्वेध संघाची स्थापना करुन समता हेच जीवनाचे लक्ष असल्याचे सांगितले. देशात ठिकठिकाणी फिरून भगवान महावीरांनी या पवित्र संदेशाचा प्रसार केला. इसवी सन पूर्व ५२७ मध्ये बिहार मधील पावापुरी येथे वयाच्या ७२ व्या वर्षी त्यांचे निर्वाण झाले. तो दिवस होता कार्तिक कृष्ण अमावस्येचा. भगवान महावीरांच्या जन्म आणि निर्वाण दिनादिवशी घराघरात दिवे लावले जातात. भगवान महावीर म्हणतात की, जाणते किंवा अजाणतेपणातून कोणाची हिंसा करणे योग्य नाही. याशिवाय दुसऱ्याच्या मार्फतही कोणाची हिंसा घडवून आणू नये कुठल्याही जीवांना मन, शरीर किंवा बोलण्याने दंडित करू नये. सर्वांच्या आत एकच आत्मा आहे. आपल्या प्रमाणेच प्रत्येक प्राण्यांना आपापले प्राण प्रिय आहे त्यामुळेच कोणत्याही प्राण्यांप्रति हिंसा करू नये. स्वतः हिंसा करणारा, दुसऱ्यांकडून हिंसा घडवून आणणारा व दुसऱ्याने केलेल्या हिंसेचे समर्थन करणारा स्वतःप्रति द्वेष वाढवत असतो असे तेच मत होते. कोणत्याही प्रकारची हिंसा न करणे हीच ज्ञानाची खरी परिभाषा आहे. अशाप्रकारे त्यांनी ज्ञानाची व्याख्या केली आहे. आपल्या आत्म्याविषयी असणारा भाव इतर प्राण्यांविषयी असू द्या. सर्व प्राणिमात्रांविषयी अहिंसेचा भाव राखा मन, वाणी आणि शरीराने कोणाचीही हिंसा न करणारा खरा संयमी म्हणून गणला जातो अशी संयमी माणसाची व्याख्या त्यांनी केली. चालताना, बसताना, बोलताना, जेवण करताना असावध असणारा, स्वतःची पूर्ण खात्री झाल्याशिवाय, पहिल्या व विचार केल्याशिवाय कृती करणारा हिंसा करत असतो असे त्यांचे मत होते. दुःखास सर्वच जीव घाबरत असतात हे लक्षात घेऊन कोणत्याही जीवास कष्ट पोहचवणे टाळावे असे ते आपल्या प्रवचनात नेहमी सांगत.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# विभागीय आयुक्त दिलीप गावडे साधणार नागरिकांशी ऑनलाइन वेबिनारद्वारे संवाद

## ११ एप्रिल रोजी दुपारी ४ ते ६ या वेळेत ‘संवाद मराठवाडयाशी’ उपक्रम

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी** - मराठवाडा विभागातील आठही जिल्हयातील नागरिक आपल्या विविध कामानिमित्त विभागीय आयुक्त कार्यालयात प्रशासकीय अधिकारी यांच्या भेटीसाठी, निवेदने देण्यासाठी येतात. आपल्या प्रशासकीय समस्यांचे निवारण करून घेण्यासाठी नागरिक येत असतात, मात्र विभागीय पातळीवरील अधिकारी अनेकदा कामानिमित्त दौऱ्यावर किंवा अन्य कामामुळे त्यांची भेट होत नाही, हीच बाब विचारात घेत विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी नागरिकांशी ऑनलाइन वेबिनारद्वारे थेट संवाद साधण्यासाठीचा ‘संवाद मराठवाडयाशी’ हा उपक्रम हाती घेतला आहे. राज्यातील या नाविण्यपूर्ण उपक्रमाचा प्रारंभ येत्या ११ एप्रिल २०२५ रोजी दुपारी ४ वाजता होणार आहे. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाबाबत विभागीय आयुक्त श्री गावडे नागरिकांशी संवाद साधणार आहेत.

विभागीय आयुक्त श्री गावडे यांच्या संकल्पनेतून ‘एक दिवस गावकऱ्यांसोबत’ या उपक्रमाची सुरूवात झाली आणि संपूर्ण प्रशासन थेट गावात पोचले. या उपक्रमाच्या यशानंतर विभागीय आयुक्त श्री गावडे यांनी मराठवाडा विभागातील आठही जिल्हयातून छत्रपती संभाजीनगर येथे प्रशासकीय कामानिमित्त येण्यासाठी थांबविण्यासाठी नागरिकांशी नागरिकांना होणारा त्रास ऑनलाइन वेबिनारद्वारे ‘संवाद मराठवाडयाशी’ या उपक्रमाची सुरूवात करण्याचा निर्णय घेतला आहे. ११ एप्रिल रोजी दुपारी ४ ते ६ या वेळेत विभागीय आयुक्त श्री गावडे महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाबाबत संवाद साधणार आहेत. श्री. गावडे यांच्यासमवेत यावेळी विभागीय पातळीवरील प्रशासकीय अधिकारीही उपस्थित असणार आहेत. प्रत्येक आठवडयात दर बुधवारी ४ ते ६ यावेळेत आयुक्त नागरिकांशी संवाद साधतील. प्रत्येक संवादावेळी प्रशासकीय विभाग व विषय ठरविण्यात येणार असून यावेळी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेशी सबंधित विषयावर विभागीय आयुक्त श्री गावडे नागरिकांशी संवाद साधणार आहेत.

नागरिकांनी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेशी सबंधित योजना, प्रश्न, असलेल्या अडचणी, योजनेच्या अंमलबजावणीचे धोरण तसेच याबाबत असलेल्या अडचणीबाबत थेट विभागीय आयुक्त यांच्याशी संवाद साधता येणार आहे. नागरिकांनी या उपक्रमात आपला सहभाग नोंदवावा, असे अवाहन विभागीय उपायुक्त डॉ. अनंत गव्हाणे यांनी केले आहे. याबाबतचा क्युआर कोडही प्रसिदध करण्यात येत आहे. नागरिकांना आपल्या मोबाईलव्दारे या उपक्रमात सहभागी होता येणार आहे.

# जग बदलणारा बाप माणूस डॉ.बाबासाहेब आंबेडकर आम्हाला समजले पाहिजे - जगदीश ओव्हळ

**मंठा । प्रतिनिधी -** विश्वरत्न महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्ताने मंठा येथे जिल्हा परिषद प्रशाला प्रांगणामध्ये (दि ६) रोजी जग बदलणारा बापमाणूस या पुस्तकाचे लेखक आणि नेल्सन मंडेला पुरस्कार प्राप्त लेखक जगदीश मोहोळ यांचे मंठा येथे विद्यार्थ्यांनो जागृत व्हा या विषयावर प्रबोधन पर मार्गदर्शन करताना म्हणाले की,अर्थतज्ञ तात्कालीन व्यवस्थेत रुपयाची किंमत नसणाऱ्या समाजात जन्माला येऊन बाबासाहेब तुम्ही या देशातील रुपयाच्या समस्येचे सविस्तर विश्लेषण केले अन रिझर्व बँक ऑफ इंडियाचा पाया उभा केला. ज्या समाजात परिवारात आर्थिक सुबत्ता कधीच नव्हती पैसा विना भौतिक सुविधा तर दूरच पण साधी भाकरी ही कधीकधी मिळायची नाही अशा परिवारात वाढलेले भीमा ते पुढे लंडनच्या ग्रेस इन मधून बॅरिस्टर होणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर हा प्रवास जगाला प्रेरणा देणारा आहे परदेशात जाऊन अर्थशास्त्र पदवी घेणारे पहिले भारतीय आणि ज्यांच्या शोधनिबंधाच्या निकषावर भारताचे रिझर्व बँक ऑफ इंडिया उभी राहिले ते महान अर्थशास्त्रज्ञ म्हणजे जग बदलणारा बाप माणूस विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर, ज्यांची सत्ता जगावर होती ज्यांच्या सत्तेचा सूर्य कधीही मावळत नव्हता अशा ब्रिटिशांच्या देशात जाऊन जगात नामांकित असणाऱ्या त्यांच्या देशातील विद्यापीठांमध्ये, त्यांच्याच आर्थिक धोरणामुळे भारतातील रुपयाचे होत असलेले अवमूल्यन, यावर संशोधन करणारे व ब्रिटिशांच्या धोरणावर जाहीर टीका करणारे महान अर्थशास्त्रज्ञ डॉ बाबासाहेब आंबेडकर जेवण करायला खिशात पैसे नाहीत म्हणून केवळ पाव खाऊन अभ्यास करणारे डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी या देशातील रुपयाची समस्या लंडन विद्यापीठात मांडली.

बालवयातच आईचं छत्र हरपल्याने भिवा आईच्या मायेला पारखा झाला होता. आईच्या मायेविना, मार्गदर्शनाविना उभा राहणारा भिवा, डॉ. भीमराव आंबेडकर ते विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हा प्रवास पूर्ण करतात आणि संपूर्ण देशातील कोट्यावधी दीनदलित अस्पृश्यांचे आई आणि बाप होतात, ही साधी गोष्ट नाही! जगाच्या पाठीवर कोट्यावधी लोकांनी ज्या माणसाला आपली आई आणि बाप मनावर असं अतुलनीय कर्तृत्व असणारा बापमाणूस म्हणजे महामानव विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर! मुलं तर बाबासाहेब जन्माला येण्याआधी ती हजारो लाखोंच्या संख्येने जन्माला




येत होतीच एक आई लेकराला जन्म देते पण त्याच लेकराला उज्वल भविष्य घेण्याचं काम डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. ज्या विद्यार्थ्याला शाळेत अस्पृश्य म्हणून वर्गाच्या बाहेर बसून शिकावं लागलं त्याच विद्यार्थ्यांचा त्या शाळेत दाखल झाल्याचा दिवस शासनाला विद्यार्थी दिन म्हणून साजरावा करावा लागतो जगात याहून अधिक प्रेरणादायी ते काय ? तो आदर्श विद्यार्थी म्हणजे डॉ बाबासाहेब आंबेडकर पोरगा बाहेर बसणारा विद्यार्थी ते जगातल्या सर्वोत्कृष्ट विद्यार्थी हे कसं साध्य झालं ? तर बाबासाहेबांनी अजन्य विद्यार्थी राहण्याची घेतलेले व्रत ! हे अजन्म विद्यार्थी राहणं प्रत्येकाला जमलं पाहिजे. येथे मुलांना बाबासाहेब बाब असं सगळ्यां बाबना वाटतं, पण कोणताच बाप रामजी बाबा व्हायला तयार नाही, तसा त्याग करायला तयार नाही,हे भयानक सत्य आहे. मुंबईच्या एका चाळीतला मुलगा ते अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठाचा ज्ञानवंत हा प्रवास आजच्या पिढीतील प्रत्येक विद्यार्थ्यांनी आदर्श नजरेसमोर ठेवला पाहिजे.

माझे बाबासाहेब किंवा मला बाबासाहेब समजले असं म्हणताना तुम्ही फक्त बाबासाहेबांच्या जातीत जन्माला आले, धर्मात जन्माला आले किंवा बाबासाहेबांना मानता, म्हणजे तुम्हाला बाबासाहेब कळले असं नाही, तर बाबासाहेब ही समजून घेण्याची आणि आचरणात आणण्याची गोष्ट आहे.याप्रसंगी मंठा शहरातील समस्त बौध्द उपासक उपासिका तथा युवा यांच्या जाणकारांची उपस्थिती होती.

## पान १ वरुन

### बालकांच्या आधारवरील ...

सुलभतेने मिळण्यास मदत होणार आहे. असे निवासी उपजिल्हाधिकारी, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### ग्रामीण भागाच्या ...

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून ग्रामीण विकास करण्यापेक्षा. शासनाच्या विविध कल्याणकारी योजना राबवून ग्रामीण भागातील लोकांच्या जीवनात सुधारणा करणे, शेती आणि उद्योगांना प्रोत्साहन दिल्याने लोकांचे उत्पन्न वाढवण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. शिक्षण, आरोग्य, आणि चांगल्या सुविधा उपलब्ध झाल्याने लोकांचे जीवनमान सुधारते.

नवीन उद्योग आणि योजनांमुळे रोजगाराच्या संधी वाढतात. स्थानिक पातळीवर विकास केल्याने लोक आत्मनिर्भर होतात. त्यामुळे ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वत्र प्रयत्न करण्यासाठी मी सदैव तत्पर राहण्याचा प्रयत्न करतो असेही यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी स्पष्ट केले.

भारतातील ६५% लोकसंख्या आजही ग्रामीण भागात राहत आहे. ग्रामीण भागातील पुनरुत्थानासाठी शासनामार्फत विविध उपक्रम राबविले गेले. महात्मा गांधीजींच्या स्वप्नातील खेडी ही स्वयंपूर्ण, स्वयंशासीत असावीत अशी सर्व ग्रामस्थांची अपेक्षा असते. शासनाच्या विविध योजना, उपक्रम व सेवा ग्रामस्थांच्या दारी पोहचविणे हेच सुप्रशासनाचे लक्षण आहे. याच मुद्दावर आधारीत ग्रामीण भागात काम करणा-या सर्व विभागांच्या अधिका-यांमार्फत प्रत्येक गावामध्ये विविध सेवा ठराविक कालावधीत पोहचविण्याच्या अनुषंगाने ग्राम दरबार - दिवस गावक-यांसोबत हा नाविन्यापुर्ण उपक्रम परतूर विधानसभा मतदारसंघात अत्यंत उत्साहाने व कल्पकतेने राबवला जात आहे याचा मला अभिमान आहे. असे प्रतिपादन माजीमंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी आज केले.

ग्रामपंचायत च्या अख्त्यारीत असणा-या विविध अभिलेख्यांवर आधारीत सेवा हमी कायद्यांतर्गत विविध उता-यांचे निर्गमन करणे, ग्रामपंचायतीच्या वरिष्ठ अधिका-यांकडून ग्रामपंचायतींचे अभिलेख्यांचे सखोल तपासणी करणे, ग्रामपंचायतच्या विविध कर वसुली त्यादिवशी १००% पूर्ण करणे, ग्रामसभेचे आयोजन करणे, वैयक्तीक विविध लाभांच्या योजनांचे अर्ज परिपुर्ण तयार करणे, ग्रामपंचायच्या विविध प्रलंबित ८-अ अंतर्गत नोंदी मंजुर करुन घेणे व नागरीकांना ८-अ चे उतारे देणे, ग्रामपंचायतकडे प्रलंबीत तक्रारींचा निपटारा करणे, गावांतर्गत रस्ते, नाली बांधकाम, दोन गावांना जोडणारे रस्ते व इतर बांधकामांन देणे या कामांसह कृषी विभागांतर्गत शेतक-यांसाठी पिक नियोजन, किड नियंत्रण, खत नियोजन, योग्य बियाणांचा वापर, रसायणमुक्त शेती, झिरो बजेट फार्मिंग अशा विविध विषयांवर मार्गदर्शन व प्रशिक्षण शिबिर आयोजीत करणे, शेतक-यांना कमी पाण्याचा वापर बाबतचे विविध तंत्रज्ञानाची माहिती देणे, शेतक-यांच्या शेतातील माती परिक्षणासाठी माती नमुने गोळा करणे, बायोगॅस, सौर चुली व विविध पारंपारिक उर्जा तंत्रज्ञानाची माहिती देणे अशी कामे करण्यात यावीत असेही लोणीकर यावेळी म्हणाले.

ग्राम शिक्षण समिती व तालुक्यांचे शिक्षण विभागाचे अधिकारी यांचे उपस्थितीमध्ये विद्यार्थ्यांचे गुणवत्ता तपासणीसाठी उपक्रम राबविणे, शाळेची संपूर्ण सफाई, स्वच्छता, पाण्याच्या टाकीची सफाई, किचन सफाई, स्वच्छतागृहांची सफाई, परिसर स्वच्छता इ. उपक्रम राबविणे, शिक्षण विभागातील अधिका-यांमार्फत शाळेची सखोल तपासणी ग्राम शिक्षण समितीच्या उपस्थितीमध्ये करणे, शाळेमध्ये विविध स्पर्धांचे आयोजन करणे, गावामध्ये प्रभातफेरीचे आयोजन करणे, नवीन शाळाखोली बांधकाम पाहणी करणे यासह महिला व बाल कल्याण व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा अंतर्गत गावातील महिलांची स्वयंसहायता गटांची स्थापना करणे, बंद पडलेल्या गटांना मार्गदर्शन करुन पुर्नजिवित करणे, स्वयंसहायता गटांना अभिलेख लिहिणे, बैठकीचे कामकाज चालविणे, बँकेचे कामकाज करणे याबाबत प्रशिक्षण आयोजीत करणे, स्वयंसहायता गटांना कौशल्य वृध्दीसाठी प्रशिक्षण देणे, विविध व्यवसाय उभारणी कामी आवश्यक ती सर्व विषयांचे प्रशिक्षण देणे हे सर्व उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी दिली.

यावेळी महिलांना संवाद कौशल्य व अन्य डेर्षी ड्ड्ढळश्रश्र चे प्रशिक्षण देणे, गावातील किशोरवयीन मुलींना आरोग्यविषयक समुपदेशनचे व्याख्यान आयोजीत करणे, महिलांना सॅनिटरी नॅपकीन वापराबाबत माहिती देणे, अंगणवाडी इमारत बांधकाम पाहणी करणे, अंगणवाडी केंद्राना भेटी देणे. कुपोषीत बालके, गरोदर महिला व स्तनदा माता यांना आहार व आरोग्य सेवा देणेबाबत पाठपुरावा करणे, वयोवृध्द लोकांसाठी स्वतंत्र तपासणी करणे, गरोदर मातांची तपासणी करणे, विविध रक्त तपासण्या करणे, माता व बालकांचे लसीकरण करणे, रक्तदान, नेत्रदान, अवयवदान इ. शिबिरांचे आयोजन करणे, नेत्र तपासणी, मौखिक आरोग्य तपासणीचे आयोजन करणे, ग्रामस्थांना आहार विषयक मार्गदर्शन करणे, ग्रामस्थांना विविध आजारांमध्ये घ्यावयाच्या काळजीविषयी मार्गदर्शन करणे, प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र बांधकामांना भेटी देणे यासारखी कामे पूर्ण करावीत अशी सूचना देखील यावेळी आमदार लोणीकर यांनी दिली.

गावातील पशुधन वाढावे यासाठी पशुधनाची आरोग्य शिबिरे आयोजीत करणे, विविध प्रकारचे लसीकरण करणे, देशी वाण संवर्धन व वृध्दीसाठी प्रशिक्षण देणे, शेतक-यांना गोठा नियोजन, मलमुत्र नियोजन, जनावरांची निगा, आहार, दुग्ध वाढीसाठी आवश्यक बाबी यांचे प्रशिक्षण देणे, शासनाच्या विविध योजनांची माहिती देऊन अर्ज तयार करणे, पशुसंवर्धन केंद्र व उपकेंद्र बांधकामांना भेटी देणे यासह समाज कल्याण विभाग अंतर्गत गावातील मागासवर्गीय वस्तीमध्येस्वच्छता अभियान राबविणे, विविध शासकीय योजनांबाबत तसेच कायदेविषयक बाबी बाबत वस्तीतील नागरीकांना मार्गदर्शन करणे, विविध योजनांचे लाभार्थी निवड करुन त्यांचे अर्ज तयार करणे, अनुसुचित जाती जमाती वस्ती अंतर्गत विकास कामांना भेटी देणे, गावातील विविध पाण्याच्या उदभवाच्या कार्यक्षेतामध्ये ग्रामस्थांच्या मदतीने स्वच्छता अभियान राबविणे, गावातील पिण्याच्या पाण्याच्या पाईप लाईन मधील लिकेज काढणे, पिण्याच्या पाण्याच्या विविध उदभवातील पाण्याचे नमुने काढणे, पाणी शुध्दीकरणाबाबत कर्मचा-यांचे प्रशिक्षण आयोजीत करणे, गावातील नागरीकांना पाणी बचतीबाबत मार्गदर्शन करणे, गावातील नागरीकांच्या घरामध्ये असणा-या नळांना तोट्या बसविणे, पाण्याची टाकी सफाई करणे, जल जीवन मिशन अंतर्गत असलेल्या योजनांना भेट देऊन पाहणी करण्यात यावी अशी सूचना देखील यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी केली.

गावांतर्गत संपुर्ण स्वच्छतेचा कार्यक्रम राबविणे, सर्व नागरीक शौचालयाचा वापर करत असल्याची खात्री करणे, जे नागरीक शौचालयाचा वापर करत नसतील त्यांना वापर करण्यास भाग पाडणे, गावातील नाल्या सफाई करणे, परस बागाची निर्मिती करणे, गावातील खुरटी झुडपे, गाजर गवत निर्मुलन करणे, गावातील नागरीकांना ओल्या व सुक्या कच-यासाठी कचरा कुंडीचे वाटप करणे, गावातील घनकच-याच्या विलगीकरणाची व कचरा प्रक्रियेची आखणी करुन त्याची सुरुवात करणे, गावामध्ये प्लास्टीक निर्मुलन मोहीम राबविणे, गावातील सांडपाण्यासाठी शौष खड्डे आखणी करुन पुर्ण करुन घेणे व नाल्यातील सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी नियोजन करणे, गावातील सर्व शासकीय इमारतींना रंगरंगोटी, डागडुजी व स्वच्छता करणे, गावातील उकिरड्यांच्या ठिकाणी नरेगा अंतर्गत नाडेफ उभारणीसाठी नियोजन करणे यासारखी कामे करावीत असे लोणीकर यांनी यावेळी स्पष्ट केले.

पुढे सिंचन व जलसंधारण संदर्भात बोलताना श्री लोणीकर म्हणाले की, गावातील शिवार फेरी ग्रामस्थांच्या समवेत करणे, गावातील विविध जलसंधारणच्या उपचारांना भेटी देऊन त्याची देखभालीसाठी ग्रामस्थांच्या समित्या तयार करणे, विविध खराब झालेल्या स्ट्रक्चरची डागडूजी करणे, लोकवर्गणीतून नाला खोलीकरण व सरळीकरण तसेच बांध बंदिस्ती या सारखी कामे करणे, मनरेगा अंतर्गत जलसंधारणाच्या विविध उपचाराची जागा निवडून त्याचा आराखडा मंजुरीसाठी तयार करणे, मनरेगा अंतर्गत विविध प्रस्ताव तयार करणे यासारखी कामे तात्काळ पूर्ण करावीत. अशा सूचना देखील यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी दिल्या. यावेळी प्रकल्प संचालक सुनिल पठारे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) उदयसिंग राजपुत, भाजपा परतुर तालुका अध्यक्ष शत्रुघ्न कणसे, परतुर गटविकास अधिकारी राजेश तांगडे पोलीस निरीक्षक सुरासे, गजानन लोणीकर, सरपंच सौ.शोभा मधुकर मोरे उपसरपंच नसरुल्ला काकड, रामदास सोळंके, बाबाराव थोरात उमेश सोळंके तुकाराम सोळंके विष्णु शहाणे, रमेश थोरात मारुती थोरात अनंत आगलावे अल्ताफ कुरेशी सोमनाथ सातपुते आसिफ कच्छी, रफिक राज सईद शेख ग्रामविस्तार अधिकारी डी.बी. काळे मोहम्मद भाई जमीनदार खैसर सर मुजिक भाई राज खंडेराव काका पाटील रामजी मोरे भगवानराव कांबळे परमेश्वर भालशंकर जिल्हा परिषद सदस्य बंकट नाना सोळंके बाबू गोसावी श्री सर गांजाळे ग्रामपंचायत सदस्य बबलू सातपुते बाबा सोळंके तालुकाध्यक्ष बाबासाहेब चव्हाण सर्व ग्रामसेवक संघटना विस्तार अधिकारी एस एम अंभोरे सर्व अंगणवाडी कार्यकर्त्या आरोग्य विभागाच्या सर्व आशा कार्यकर्त्या आष्टीतील सर्व बचत गटाच्या महिला यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन

**जालना -** सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागामार्फत भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहानिमित्त विविध कार्यक्रमाचे दि. ८ एप्रिल ते १४ एप्रिल २०२५ पर्यंतच्या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे. तरी विविध कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त, समाज कल्याण, जालना यांनी केले आहे.

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व वंचित दुर्बल घटकातील व्यक्तींच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय साध्य करण्यासाठी राज्य शासनाकडून विविध कल्याणकारी योजनांची माहिती सर्वसामान्य जनतेला व्हावी तसेच जनतेत जनजागृती निर्माण व्हावी या उद्देशाने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. यामध्ये कार्यक्रमाचे उद्घाटन, भारतीय संविधानाची उद्देशिका, प्रस्ताविका यांचे वाचन, भारतीय जनतेत संविधानाविषयी जनजागृती निर्माण करणे, विविध स्पर्धा, कार्यशाळा, मेळावा, व्याख्यान आदि कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

## राज्य कृषी मुल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल जालना दौऱ्यावर

**जालना -** राज्य कृषी मुल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल (मंत्री दर्जा) हे जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौऱ्यातील कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

शुक्रवार दि.११ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ८.३० वाजता शासकीय विश्रामगृह जालना येथे आगमन व राखीव. सकाळी १० वाजता शासकीय विश्रामगृह येथून रानउद्योग फार्मर्स प्रोड्युसर कंपनीद्वारे आयोजित बांबु वस्तुंचे प्रदर्शन व विक्री कार्यक्रमाच्या उदघाटन सोहळ्यास महेश भवन जालना येथे उपस्थित राहतील. सोईनुसार जालना येथून लातुरकडे प्रयाण करतील







# ऐतिहासिक मोटरसायकल रॅलीत अहिंसेचा गजर

## सामूहिक नवकार मंत्र जपाने दुमदुमले गुरु गणेश भवन





**जालना । प्रतिनिधी -** भगवान महावीरांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला, बुधवार दि. ९ एप्रिल रोजी जालना शहरात जैन युथ क्लब आणि सकल जैन समाज जालना यांच्यावतीने काढण्यात आलेली अहिंसा म ोटारसायकल रॅली ही इतिहास घडवणारी ठरली. अहिंसा परमो धर्मः या दिव्य संदेशाने भारलेली ही रॅली श्रद्धा, शिस्त आणि सामाजिक जाणीवांचा उत्कट संगम ठरली. रॅलीची सुरुवात दुपारी ३.३० वाजता गुरु गणेश भवन येथून करण्यात आली. याप्रसंगी संजय लव्हाडे, विजय जैन, प्रमोद देसरडा, धनराज जैन, संजय मुथा, सुभाष वायकोस, राजेश लुनिया, स्वप्निल लव्हाडे, श्रीपाल मरलेचा, विजय सावजी, श्री. पिपाडा, चेतन बोथरा आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी भगवान महावीरांच्या प्रतिम ेचे पूजन करण्यात आले. हातात फलक, शांती आणि अहिंसेच्या घोषणा देत शेकडो दुचाकीस्वार रॅलीमध्ये सहभागी झाले होते. सहभागी बांधवांनी शिस्त, नियम आणि सौजन्य पाळत रॅलीचं अनुकरणीय उदाहरण सर्वांसमोर ठेवले.

गुरु गणेश भवन येथून सुरू झालेली रॅली उडपी चौक, सराफा, पाणी वेस, श्री मंम ादेवी मंदिर, गांधी चमन, जुना जालना जैन मंदिर, मामा चौक, बालाजी गल्ली, शोला चौक, बडी सडक मार्गे पुन्हा गुरु गणेश भवनकडे प्रयाण करताना शहरातील प्रत्येक रस्ता भक्तिभाव, शांती आणि सकारात्मकतेने भारून गेला. अहिंसा हीच खरी शौर्याची ओळख, भगवान महावीर की जय अशा गगनभेदी जयघोषाने परिसर भक्तीमय बनला.

ठिकठिकाणी नागरिकांनी रॅलीचं स्वागत केले. पुष्पवृष्टी व टाळ्यांच्या गजरात समाजबांधवांनी दिलेल्या संदेशाला पाठिंबा दिला. ध्वनीप्रदूषणविरहित, सुसंस्कृत आणि पर्यावरणपूरक रॅलीचं शहरभर कौतुक झाले. संयम, क्षमा, करुणा आणि अहिंसेचा जागर करून रॅलीने एक सशक्त, सुसंस्कृत आणि शांततामय समाजाची प्रेरणा दिली.

**सामूहिक नवकार मंत्र जपाने दुमदुमले गुरु गणेश भवन**

विश्व कल्याणासाठी ९ एप्रिल हा विश्व नवकार दिन म्हणून १०८ देशात साजरा करण्यात आला. दिल्लीच्या विज्ञान भवनात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह सेलिब्रिटी, लोकप्रतिनिधी यांच्या उपस्थितीत सामूहिक नवकार जप करण्यात आला. त्याच धर्तीवर जालन्यातही जितो विंग जालना व सकल समाजातर्फे सकाळी ८ ते ९ या वेळेत गुरु गणेश भवनात हजारो सकल जैन समाज बांधवांच्या उपस्थितीत सामूहिक नवकार मंत्रजपाचे आयोजन करण्यात आले होते. मंत्रजप हा केवळ धार्मिक कार्यक्रम नव्हता, तर तो आध्यात्मिक जागृतीचा, एकतेचा आणि शांततेचा सोहळा ठरला. हजारो समाज बांधवांनी उपस्थित राहून, एकसूरात शांती, क्षमा आणि करुणा या मूल्यांनी भारलेला नवकार मंत्र जपला. मंत्रोच्चाराच्या प्रत्येक ध्वनीलहरीत एक ऊर्जा होती, तिने परिसरात भक्तिभावाचं वातावरण निर्माण केले. वृद्ध, युवक, महिला आणि बालकांचाही मोठा सहभाग लाभला. या सामूहिक उपक्रमामुळे जालन्यातील जैन समाजात नवचैतन्य संचारले असून, हा सामूहिक मंत्रजप एक शांततामय, सुसंस्कृत आणि मूल्यनिष्ठ समाज घडवण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरला. याप्रसंगी समाज बांधव, बंधू- भगिनी, युवक- युवती, अबालवृद्ध शुभ्र पोशाखात उपस्थित होते.



**जालना शहरातील मोती तलावामध्ये एक विहीर आहे. गेल्या अनेक वर्षापासून ही विहिरी प्लास्टिक कचऱ्याने गच्च भरली आहे. ते विहिरीची प्रचंड दुरवस्था झाली की घाणीमुळे विहिरीच्या पाणी दिसत नाही. (छाया मजहर सौदागर)**

# चापडगाव येथे संतप्त शेतकऱ्यांनी रास्ता रोको करून टायर जाळून आंदोलन

**जालना । प्रतिनिधी -** जालन्यात शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी एका तरुणाने जिल्हाधिकारी कार्यालयासम ोर आमरण उपोषण सुरू केलंय. गजानन उगले असं या राणी उंचेगावं येथील तरुण शेतकऱ्याच नाव आहे. फळ उत्पादक शेतकऱ्यांना मंजूर झालेला रब्बी हंगामातील फळ पिक विमा तातडीने वितरित करण्याच्या प्रमुख मागणीसाठी त्यांनी आमरण उपोषण सुरू केलंय. शेतकरी गजानन उगले यांच्या उपोषणाचा आज नऊवा दिवस आहे. अद्याप पर्यंत गजानन उगले यांच्या उपोषणाची दखल जिल्हा प्रशासनाने घेतली नाहीये. त्यामुळे घनसावंगी तालुक्यातील चापडगाव राणी ऊंचेगाव येथे संतप्त शेतकऱ्यांनी आज टायर जाळून आंदोलन केलंय.

आज शेतकऱ्यांनी घनसावंगी तालुक्यातील चापडगाव या ठिकाणी रास्ता रोको आंदोलन करून टायर पेटवत



रस्त्यावरील वाहतूक रोखून धरली.तसेच राज्य सरकार विरोधी घोषणाबाजी करून परीसर दणाणून सोडला. अर्धा तास हे रास्ता रोको आंदोलन सुरू होतं.या आंदोलनामुळे घनसावंगीकडे जाणारी वाहतूक विस्कळीत झाली होती.

# जालन्यात २० एप्रिल रोजी पेशवा संघटनेच्या वतीने राज्यस्तरीय वधू- वर परिचय मेळावा



**जालना । प्रतिनिधी -** अखिल भारतीय पेशवा संघटनेच्या वतीने जालना शहरात दिनांक २० एप्रिल रोजी सर्व शाखीय ब्राह्मण समाजासाठी राज्यस्तरीय वधू- वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती या वधू- वर परिचय मेळावा आयोजन समितीचे स्वागताध्यक्ष सचिन वाडे पाटील यांनी आज( दि. ९) पत्रकार परिषदेत दिली.

ब्राह्मण सभा कार्यालयात आयोजित या पत्रकार परिषदेस रमेश देहेडकर, ड. सुनील किनगावकर, संतोष जोशी, विजय काजे,बंकट खंडेलवाल, चंद्रकांत कुलकर्णी, लक्ष्मीकांत दडके आदींची उपस्थिती होती.

पत्रकार परिषदेत अधिक माहिती देतांना वाडे पाटील म्हणाले की, ब्राह्मण समाजात अलिकडे अनेक मुलांची- मुलींचे विवाह होत नाही, उपवर मुला- मुलींचे विवाह न होणे, ही एक समस्या होवून बसली आहे. शहर व ग्रामीण भागात ही परिस्थिती आहे. याबाबत पेशवा संघटनेच्या वतीने महाराष्ट्रभर जनजागृती करून प्रबोधन केले जात आहे. यासाठी पेशवा संघटनेच्या वतीने छत्रपती संभाजीनगर, परभणी, पुणे येथे राज्यस्तरीय वधू- वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. हे मेळावे यशस्वी झाल्यानंतर दिनांक २० एप्रिल रोजी जालना शहरात चौथ्या वधू- वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. ब्राह्मण सभा सभागृहात सकाळी १ ते सांयकाळी ६ दरम्यान हा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यात जवळपास ३०० तरूण- तरुणी सहभागी होतील. या मेळाव्यास कल्याणराव देशपांडे हे मार्गदर्शन करणार आहेत. ब्राह्मण समाजातील ज्येष्ठ सामाजिक नेते रमेश देहेडकर यांच्या हस्ते व ड. सुनील किनगावकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित या मेळाव्यास लक्ष्मीकांत दडके, संतोष जोशी, शाम कुलकर्णी, प्रमोद झाल्टे, म नोज जोशी, संजय देशपांडे, अभय जोशी, विजय काजे आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

या वधू- वर परिचय मेळाव्यासाठी सर्व शाखीय ब्राह्मण समाजातील प्रथम वधू- वरांना तसेच घटस्फोटित, विधवा, विदूर, दिव्यांग यांची नाव नोंदणी सुरू करण्यात आली आहे. या मेळाव्यास सर्व शाखीय ब्राह्मण समाजातील उप वर व वधुंनी उपस्थित राहावे, असे आवाहनही वाडे पाटील यांनी यावेळी केले.

# गोवा येथे दृष्टी लायन नेत्रालय सन्मानित



**परतूर । प्रतिनिधी -** गोवा येथे झालेल्या प्रांतीय अधिवेशनामध्ये लायन्स क्लब ऑफ परतूरला सेवा कार्यासाठी वेगवेगळे पाच पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. इंटरनॅशनल डायरेक्टर पंकज मेहता

माजी इंटरनॅशनल डायरेक्टर नवल मालु बहुप्रांतीय अध्यक्ष सुनील देसरडा प्रांतपाल गिरीश सिसोदिया आदी मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले आहेत

यामध्ये विशेष नेत्र सेवा पुरस्कार मनोहर खालापूरे यांना देऊन सन्मानित करण्यात आले नेत्र सेवेच्या माध्यमातून ५५०० मोती बिंदू शस्त्रक्रिया केल्याबद्दल पुरस्कार देण्यात आला बेस्ट प्रेसिडेंट पुरस्कार प्रमोद टेकाळे यांना तर

मॅरेथॉन आयोजनासाठी चा संदीप चव्हाण व इतर दोन पुरस्कार क्लब च्या सेवाकार्यासाठी देण्यात आले गोवा येथे झालेल्या अधिवेशनासाठी परतूर येथून लायन डॉक्टर भानुदास कदम कोषाध्यक्ष प्राध्यापक मधुकर भोसले प्राध्यापक प्रमोद टेकाळे मनोहर खालापूरे विशेष उपस्थित होते.



**महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांची आमदार अर्जुनराव खोतकर यांनी मंगळवार (दि ८) रोजी विधिमंडळात सदिच्छा भेट घेतली. यावेळी विधिमंडळ अंदाज समिती प्रमुखपदी निवड झाल्याबद्दल आ. अर्जुनराव खोतकर यांचा पुष्पगुच्छ देऊन अध्यक्ष नार्वेकर यांनी सत्कार केला. व समीतीच्या कार्यास पुर्णपणे सहकार्य करू असे सांगत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**

# परतूर तहसील कार्यालयाच्या प्रांगणात मोफत पिण्याच्या पाण्याची व्यवस्था

## खासगी व्यावसायिकांचा पुढाकार, भर उन्हात मिळतेय थंडगार पाणी

**परतूर । प्रतिनिधी -** परतूर येथील तहसील कार्यालयासमोरील लिंबाच्या झाडाखाली बसून लोकांना विविध प्रकारची सेवा देणारे खासगी व्यावसायिक उन्हाळ्याच्या दिवसात तहसील किंवा उपविभागीय कार्यालयात कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांची पिण्याच्या पाण्याची मोफत सोय करतात. मागील चार वर्षांपासून त्यांचा हा उपक्रम नियमितपणे सुरु आहे हे विशेष. सध्या दररोज ८ ते १० पाण्याच्या जार लागतात. येथील तहसील कार्यालय तसेच उपविभागीय कार्यालयाच्या प्रांगणात लिंबाचे एक डेरेदार झाड आहे. झाडाच्या सावलीत बसून नोटरी,मुद्रांक विक्रेते, विविध प्रकारचे अर्ज लिहून किंवा टाइप करून देणारे व्यावसायिक आपापला व्यवसाय करतात. उन्हाळ्याच्या दिवसात ॲड. सुभाष पडिभार, दादाराव प्रधान, स्वप्नील पहाडे, शिवप्रसाद प्रधान, उत्तम सोनपसारे, रंगनाथ पहाडे, शिवाजी काटे, मंजूर कादरी हे सर्वजन मिळून तहसील किंवा उपविभागीय कार्यालयात कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांसाठी थंडगार पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करतात.



हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.